# प्रकरण दुसरे

# संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन पद्धती

# प्रकरण दुसरे
# संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन पद्धती

## प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन पद्धती विषयीची माहिती दिली आहे. प्रकरणाची विभागणी दोन विभागात केली आहे. पहिल्या विभागात समर्पक उपलब्ध साहित्याच्या परिशिलनावरून आधिच्या संशोधनाच्या प्रमुख निष्कर्षांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. दुसऱ्या विभागात प्रस्तुत अभ्यासासाठी अवलंबविण्यात आलेल्या संशोधन पद्धती विषयीचे विवेचन केलेले आहे.

## विभाग पहिला

## २.१ संशोधन साहित्याचा आढावा : (The Review of Literature)

माणगांव खेड्यातील बदलत्या बेरड समुदायाचा एक समाजशास्त्रीय अभ्यास हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा विषय आहे. महाराष्ट्रातील बेरड ह्या जमातीचा विमुक्त जातीमध्ये समाविष्ट केलेला आहे. तेव्हा बेरड जमातीसारख्या कितीतरी जाती जमातीविषयी अनेक संशोधनात्मक स्वरूपाचे समाजशास्त्रीय अभ्यास झालेले असतील. तथापि बदलत्या सामाजिक परिस्थितीमधील बदल आणि समायोजन तसेच त्यांचा विकास आणि एकंदरीत राष्ट्राची प्रगती या दोहोमधील संबंधाविषयीचे आधीचे अभ्यास प्रस्तुत अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. त्यामुळे संशोधनात्मक साहित्याच्या परिशिलनासाठी समर्पक अशा अभ्यासांची जाणीवपूर्वक निवड केली आहे. या निवडक संशोधनात्मक अभ्यासांच्या परिशिलनावरून समोर आलेले ठळक निष्कर्ष थोडक्यात सादर केले आहेत.

### गस्ती भिमराव :

यांनी आपल्या **'बेरड'**(१९८७)[१] या आत्मकथन लिहिलेल्या पुस्तकामध्ये त्यांनी आपल्या बेरड समाजाचे संपूर्ण चित्रण केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी बेरड समाज कोणत्या परिस्थितीत आपले जीवन जगत होता, बेरड लोकांना समाजामध्ये कोणत्या प्रकारची वागणूक दिली जात

होती. त्यांना पोलीस कशाप्रकारे छळत होते. तसेच बेरड लोकांत आप-आपासामध्ये कशा प्रकारचे संबंध होते. याचे संपूर्ण विवेचन त्यांनी केलेले आहे. लेखकाच्या मते बेरड समाज हा पूर्णता अज्ञानी, निरक्षर होता. त्यांना आपले हित कशामध्ये आहे याची कल्पना नव्हती याचाच फायदा समाजामधील दलाल लोक, राजकारणी लोक, श्रीमंत लोक अनेक प्रकारे त्याचा फायदा उठवत असत. प्रसंगी ते बेरड लोकांमध्ये भांडणेसुद्धा लावून देण्याचे काम करत असत. याचा परिणाम बेरड लोकांमध्ये आप-आपसामध्ये सतत संघर्ष होत असे. हे लोक डोंगर दरी-खोऱ्यामध्ये राहत असून सतत ते पोटाची खळगी भरण्यासाठी भटकत असतात. याच कारणामुळे त्यांच्यामध्ये चोरी करण्याचे प्रमाण वाढत गेले. त्यातून गुन्हेगार प्रवृत्तीचेही प्रमाण वाढले. याचा परिणाम बेरड या जातीला गुन्हेगारी जमात ठरविली गेली.

लेखक हा बेरड समाजामधील असून तो एक सामाजिक कार्यकर्ता आहे. त्याने आपल्या समाजावर होत असलेला अन्याय, अत्याचार दूर करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या चळवळी सुरू केल्या, आपल्या समाजामधील लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. चळवळीद्वारे शासनाचे लक्ष बेरड समुदायाकडे खेचून घेण्याचा यशस्वी प्रयत्न त्यांनी केलेला दिसून येतो. 'बेरड' या आत्मकथनामध्ये त्यांनी ऑगस्ट १९८२ पर्यंतच्या घटनांचे विवेचन केलेले आहे. 'बेरड' हे पुस्तक पोलिसी अत्याचारांचा दस्तऐवज आहे.

यांनी आपल्या दुसऱ्या **'आक्रोश' (१९९३)**[२] या आत्मकथनामध्ये बेरड समुदायाच्या चळवळी विषयीचे विस्तृत विश्लेषण केलेले आहे. यामध्ये १९८२ नंतर च्या सर्व चळवळीच्या घटना दिलेल्या आहेत. या पुस्तकामध्ये चळवळीमध्ये काय काय घडले हे सगळे प्रांजळपणे मांडलेले आहे. लेखकांनी वेगवेगळ्या प्रकारच्या बेरड समुदायाविषयीच्या चळवळी केलेल्या आहेत. त्या प्रामुख्याने पुढील चळवळींचा समावेश केलेला आहे...

१.देवदासींच्या पुनर्वसनासंबंधीची चळवळ २.नवलतीर्थचे देवदासी शिविर ३.नेसरीची चळवळ ४.पोलीसांच्या अत्याचाराविरूद्धची चळवळ ५.चंदगडचा देवदासी मोर्चा ६.जमिन गिळणाऱ्या कारखान्याविषयीची चळवळ ७.बेळगाव परिषद ८.जागृती मोर्चा आणि दारू गाळणे परवानगी मोर्चा ९.जमिनदाराविषयीची चळवळ १0.दड्डीचे शिविर ११.पदयात्रा

इ. बेरड समुदायाला एकीकडे पोटाची चिंता दुसऱ्या बाजूने पोलीस खात्याकडून होणारे अमानुष छळ तिसऱ्या बाजूने प्रस्थापित वर्गाकडून होणारी उपेक्षा, अत्याचार आणि आपल्याच स्वकीय जात बांधवाकडून होणारे हिंस्त्र छळ, शोषण ह्या सर्वांना तोंड देत बेरड समुदायातील ज्ञानी लोकांनी चळवळ केली. प्रत्येक गोष्टीसाठी त्यांना संघर्ष करावा लागला, आक्रोश करावा लागला. तेव्हा कुठ शासनाचे बंदिस्त दरवाजे उघडले गेले.

यांनी आपल्या **'सांजवारा' (२००२)**[३] या स्वानुभव कथन लिहिलेल्या पुस्तकामध्ये बेरड समुदायातील लोकांची सत्य परिस्थिती कथन केलेली आहे. यामध्ये लेखकाने स्वत:बद्दलचे कटु अनुभव सांगितलेले आहे. ते म्हणजे बेरडा-बेरडामधील असलेले नाते संबंध, बेरड लोकांच्या मुलांचे शाळेमध्ये असलेले प्रमाण, बेरड लोकांकडे इतर लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन, बेरडांची चोरी करण्याची प्रवृत्ती, बेरड लोकांमध्ये स्त्रीयांशी असलेले संबंध, राजकीय पातळीवर बेरड लोकांना असलेले स्थान आणि बेरड लोकांच्या धाडसी पराक्रमी आणि हृदयहीन असलेल्या स्वभावाचे विवेचन केलेले आहे.

महाराष्ट्र-मानव विज्ञान परिषदेने प्रकाशित केलेल्या **'हाकारा'**[४] या त्रैमासिकामध्ये "भटक्या-विमुक्त, जाती-जमाती एक पार्श्वभूमी" (रामकृष्ण माने), "भटक्या जमातीच्या व्यथांची कहाणी" (रमाकांत रामचंद्र), "भटक्या विमुक्त जमाती एक ऐतिहासिक मागोवा" (लक्ष्मण माने), "भटकू नका, तुम्हाला कोण भटकायला सांगतय?" (बाळकृष्ण रेणके), "महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातींचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश का? (प्रा. मोतीराज राठोड) "भटक्या-विमुक्त जमाती विकासाचे प्रयत्न" (बाळकृष्ण रेणके) इ. लेख प्रसिद्ध केलेले आहेत. प्रस्तुत लेखामधून भटक्या विमुक्त जाती-जमातींची माहिती त्यांचे प्रश्न, त्यांची व्यथा, त्यांच्या विकासांचे प्रयत्न इत्यादीबाबत संक्षिप्त माहिती दिलेली आहे ती पुढीलप्रमाणे आहे.

## माने रामकृष्ण :

यांचा प्रकाशित झालेला लेख **'भटक्या विमुक्त जाती-जमाती एक पार्श्वभूमी'**[५] यामध्ये त्यांनी देशाच्या संस्कृतीचा एक अविभाज्य घटक म्हणून भटक्या विमुक्त जमातींचा उल्लेख केलेला आहे. यामध्ये त्यांनी भटक्या विमुक्त जाती-जमाती ह्या गुन्हेगारी जमाती कशा

ठरल्या? याचे स्पष्टीकरण केले आहे. त्यांची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक स्थिती अत्यंत मागास आसल्या आहे. हे स्पष्ट केलेले आहे. तसेच त्यांनी अनेक कार्यक्रमांचा समाजाला होणारा फायदा या कार्यक्रमांबाबत त्यांना काय वाटते? कार्यक्रमातून प्रबोधन, भटक्या विमुक्तांचे प्रश्न, स्वरूप व उपाय, भटक्या विमुक्तांची जनगणना व्यवस्थित व्हावी, त्यांच्यासाठी नागरी सुविधा, भटक्या विमुक्तांच्या निवाराविषयक समस्या, त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न, भटक्या विमुक्तांचे पुनर्वसनाचे नियोजन, शासकीय धोरण, सामाजिक दृष्टीकोन, संशयित गुन्हेगार म्हणून असलेला शिक्का घालविण्यासाठी उपाय आणि भटक्या विमुक्त जमातींच्या मागण्या केंद्र व राज्य सरकारकडे इत्यादी प्रश्नावरील चर्चा त्यांनी आपल्या लेखात केलेली आहे.

## रमाकांत रामचंद्र :

यांनी **'भटक्या जमातींच्या व्यथांची कहाणी'**[६] या आपल्या लेखात लक्ष्मण माने यांच्या 'उपरा' व 'बंद दरवाजा' या पुस्तकातील अनुक्रमे भटक्या जमातींचे दर्शन घडविणारे आणि स्वतंत्र भारतातील अनेक भटक्या जमातींच्या बंदिस्त भीषण जीवनाचा शोध घेणाऱ्या पुस्तकांचे रसग्रहण केलेले आहे.

## रेणके बाळकृष्ण :

यांनी आपल्या **'भटकू नका तुम्हाला कोण भटकायला सांगत ? आणि 'भटक्या विमुक्त जमाती विकासाचे प्रयत्न'**[७] या दोन्ही लेखामध्ये भटक्या विमुक्त जमातींचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने गेल्या पंधरा वर्षात झालेले प्रयत्न, राज्यकर्त्यांशी आलेले संपर्क, त्यातून आलेले अनुभव आणि राज्यकर्त्यांनी दाखविलेली भटक्या विषयीची बेपर्वाई बाळकृष्ण रेणके यांनी समर्पकपणे मांडलेली आहे. तसेच भटक्या-विमुक्त जमातींची ओळख, विमुक्त जमाती, भटक्या जमाती, भटक्या विमुक्त जमातींची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक अवस्था, भटक्या विमुक्त जमातींचे वेगळेपण समकालीन महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातींचे वेगळेपण, समकालीन महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातींच्या जीवनाची ओळख करून देणाऱ्या संशोधनाची गरज, अन्याय अत्याचाराचापासून सुटका होण्यासाठी त्यांच्या संरक्षणाचा स्वतंत्र कायदा करणे,

संरक्षणाचा कायदा व त्याच्या अमंलबजावणीसाठी फिरत्या न्यायालयाची नेमणूक होणे आवश्यकता आणि भटक्या विमुक्तांच्या कल्याणासाठी शासनाने सुरू केलेल्या काही कल्याणकारी योजनांची अमंलबजावणी पाहणे यासारख्या गंभीर प्रश्नांची चर्चा यामध्ये केलेली आहे.

## राठोड मोतीराज :

यांनी आपल्या **'महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जमातींचा समावेश अनुसूचित जमातींमध्ये का?'**[८] या लेखात अनुसूचित जमाती सूचिमधील दुरूस्ती आणि महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांवर अन्याय कसा झाला? याचे विवेचन केलेले आहे.

## माने लक्ष्मण :

यांनी **'भटक्या विमुक्त जमाती एक ऐतिहासिक मागोवा'**[९] या लेखात 'भटक्या' या शब्दाची उत्पत्ती कशी झाली? भटके म्हणजे काय?, भटक्यांचे प्रकार किती आहेत? भटक्या विमुक्त जमाती-गुन्हेगारी जमात कशी ठरली? विमुक्त जमाती आणि भटक्या जमाती कोणकोणत्या आहेत त्यांची लोकसंख्या किती आहेत? आणि जमातींच्या पुनर्वसनाचे प्रयत्न या संबंधाची चर्चा केलेली आहे.

यांनी आपल्या **'विमुक्तायन महाराष्ट्रातील विमुक्त जमाती-एक चिकित्सक अभ्यास (१९९७)**[१०] या मराठी पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील विमुक्त जमाती व जाती यांचा चिकित्सकपणे अभ्यास केलेला आहे. या पुस्तकातील महत्त्वाची बाब म्हणजे विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना गुन्हेगार जमात घोषित केलेला ऐतिहासिक संदर्भ दिसून येतो. त्यांच्या मते गुन्हेगार जमातींना इतर जमातीपेक्षा वेगळी वर्तणूक दिली जात असे. त्यांना इतर जमातीपासून वेगळे तारांचे कुंपण असलेल्या जागेमध्ये ठेवले जाई. म्हणजे त्यांचे जीवन बंदिस्त करून टाकले होते. कालांतरानंतर त्यांच्या परिस्थितीमध्ये बदल होऊन भारत सरकारने त्यांना त्यातून सुटका करून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न केलेले दिसून येतात. याचा परिणाम म्हणजे त्यांच्याबद्दल लोकांच्या मनामध्ये असलेला दृष्टीकोन हळूहळू बदलू लागला. या पुस्तकामध्ये लक्ष्मण माने यांनी महाराष्ट्रातील विमुक्त जमातींचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक दर्जा

त्यांचा व्यवसाय त्यांचे संघटन आणि एकंदरीत त्यांच्या जीवनपद्धतीचे विवेचन केलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी त्यांच्या सामाजिक कल्याणासाठी आणि विकासासाठी काही उपाय योजना सुचविलेल्या आहेत.

आपल्या **'बंद दरवाजा'**[११] या पुस्तकामध्ये भटक्या जमातीचं दर्शन घडविलेले आहे. यामध्ये त्यांनी स्वतंत्र भारतातील अनेक भटक्या जमातींच्या बंदिस्त भीषण जीवनाचा घेतलेला शोध आहे. अनेक वाड्या, वस्त्या, तांडे, बिऱ्हाडांमधून फिरून त्यांनी त्यांचे जीवन जवळून पाहिलं व अनुभवलं ते खरोखरच भयावयक आहे. आपण आपल्याला किती सुरक्षित बंदिस्त करून ठेवलय? हे 'बंद दरवाजा' वाचताना पदोपदी जाणवते. 'बंद दरवाजात' कागद, कापड, बुट, काचा गोळा करणाऱ्यांचे जीवन आहे, जन्म तारखेचा दाखलाच मिळू शकत नाही म्हणून त्यांच्या शाळेत न जाऊ शकणाऱ्या मुलांचं अंधार भवितव्य आहे. गोपाळ धनगरा संबंधी माहिती आहे, गिरजाअक्काची कहाणी आहे, त्यांच्यातील बालविवाहाच्या दुष्ट रूढींचा अनुभव आहे, बालविवाहाविरूद्ध चाललेल्या प्रयत्नांचा आढावा आहे, तेथे चालू असलेल्या विधायक कामाची नोंद आहे, पारध्याच्या पालाचं वर्णन आहे, वैदु-गोंधळ्यांसंबंधी तर बंजारा जमातीसंबंधीची विस्तृत माहिती आहे. अशा एक ना अनेक लोकांचा 'बंद दरवाजा' म्हणजे जीवनपटच आहे.

बंद दरवाजात स्त्री-जीवनाच्या अनेक भीषण अनुभवांची नोंद आहे. कंजारभाट ह्या गावोगावी फिरणाऱ्या समाजाचं चित्र आहे. मानेंचा 'बंद दरवाजा' म्हणजे भटक्या जमातीच्या व्यथांची एक कहाणीच आहे. माने त्या व्यथांचे पदर आपल्यासमोर उघडे करत जातात.

यांनी आपल्या **'उपरा' (१९९०)**[१२] या पुस्तकामध्ये विमुक्त जमातीतील लोकांच्या हालाखीचे दर्शन आजही चपखलपणे मांडले आहे. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे भटक्या विमुक्तांचे मानबिंदू होय. सदर पुस्तकात प्रश्न हा एका माणसाचा नसून असे हजारो लक्ष्मण माने झोपडपट्ट्यांत, फुटपाथवर, गावकुसाबाहेर आणि ज्यांना गावकुसही नाही जे दऱ्याखोऱ्यात रानोमाळात खितपत पडले आहेत त्यांचा आहे. त्यांना ना संधी, ना सोय, ना सवलत, ना आधार, ना निवारा, ना दोन वेळच्या पोटाची सोय असे असंख्य प्रश्न प्रस्तुत पुस्तकात

लेखकांनी अतिशय समर्पक रितीने मांडले आहेत. काही जमाती गुन्हेगार ठरवल्या आहेत. गुन्हा केला नसताना सुद्धा गुन्ह्याचा आळ त्यांच्यावर येतो आणि कायद्याचे रक्षकच त्यांचा गैरफायदा घेत असल्याच्या प्रसंगातून त्यांच्या दयनिय स्थितीचे दर्शन घडते. स्त्रियांच्या उन्नतीसाठी अत्याचाराविरोधी कडक कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी सदर पुस्तक उपयुक्त ठरते. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा, चिंतन, कला या साऱ्या विभागात त्यांचा 'उपरा' हा कलंक पुसण्याच्या दृष्टीने केलेला प्रयत्न समर्पक रीतीने मांडला आहे. लक्ष्मण माने यांनी जे जीवन भोगलं, अनुभवलं, पाहिलं तसंच लिहलं. पिढ्यान पिढ्या बिऱ्हाड पाठीवर घेऊन गाढवाचं जीणं जगणाऱ्या मंडळींच्या वेदना या पुस्तकाद्वारे संशोधनकार्यास हातभार लावण्याचे कार्य करतात. म्हणून माझ्या या संशोधन कार्यास हा ग्रंथ उपयुक्त आहे.

यांनी आपल्या **'पालावरचे जग' (१९९०)**[१३] या ग्रंथामध्ये भटक्या विमुक्तांच्या जीवनाचे वास्तववादी विदारक चित्रण केलेले दिसून येते. अनेक समस्यांनी ग्रासलेला उपेक्षित भटक्या विमुक्तांच्या समाजात स्वाभिमान जागृतीसाठी त्यांच्या उन्नतीसाठी हा ग्रंथ निश्चितच प्रेरणादायी आहे. लेखकाचे लेखन हे भटक्या विमुक्तांसाठी केलेल्या कार्याचा, चळवळीचा व स्वाअनुभवाचाच गोषवारा आहे. त्यामुळे लेखकाचे लेखण हे वास्तववादी आहे. लेखक स्वत: भटक्या विमुक्तांचे प्रतिनिधित्व करतात त्यामुळे त्यांचे लिखाण हे सहभागी निरीक्षण, भेटी मुलाखतीवर आधारीत असून समर्पित संशोधनात्मक आहे. सदर पुस्तकात भटक्या विमुक्त जमातीवरील अत्याचाराचे प्रत्यक्षदर्शी चित्रण केलेले दिसून येते. तसेच त्यांनी भटक्या समाजाच्या परिवर्तनातील अडथळ्याची मांडणी भेदकपणे केली आहे. भटक्या विमुक्तांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन आणण्यासाठी हा ग्रंथ निश्चितच प्रेरणादायी ठरणारा आहे.

यांनी **'विमुक्तांयन' (१९९७)**[१४] या ग्रंथामध्ये भटक्या विमुक्त जमातीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे चित्रण केले आहे. सदर ग्रंथामध्ये लेखकाने आदिम व विमुक्त जमातींच्या मुळ उगमांचा शोध घेतला आहे. जंगलात राहणारे, गावाबाहेर राहणारे, शहरांजवळ राहणाऱ्या भटक्या विमुक्तांच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचे वर्णन प्रत्यक्षदर्शी

आणि वास्तवादी आहे. मातृसत्ताक कुटुंबपद्धतीद्वारे स्त्रियांच्या तत्कालीन स्थितीवर प्रकाश टाकला आहे. देवदेवता, लग्नविधी, मृत्यू संस्कार इत्यादीवावत विमुक्त जमाती व अन्य बहुजन समाज यांचा तुलनात्मक अभ्यास प्रस्तुत पुस्तकामध्ये मुख्य जमाती, त्यांच्या पोटजाती, त्यांची बोलीभाषा, विवाहपद्धती, जन्मविधी, धार्मिक जीवन, नरवळी देण्याची प्रथा, अंधश्रद्धा, स्त्रि-पुरूषांचा पोशाख, दागिने, सण-उत्सव, पंचायत, प्रशासन यंत्रणा थोडक्यात त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीचे यथार्थवादी दर्शन करून दिले आहे. सदर पुस्तकात अनिष्ट प्रथेविरूद्धचे कायदे स्पष्ट केले असल्याने त्यांच्या उन्नतीसाठी लेखकाने केलेले महत्त्वपूर्ण योगदान दिसून येते. भटक्या विमुक्तांना मिळणारी शासकीय मदत त्यांची शैक्षणिक परिस्थिती, भू-धारणा, नागरी सुविधा, गुन्ह्यांची स्थिती विभागवार नकाशा, आलेख यांच्या सहाय्याने लेखकाने सुस्पष्टरित्या मांडली आहे. या पुस्तकातून संशोधनकार्यासाठी निश्चितच मार्गदर्शक अशी वस्तूनिष्ठ माहिती मिळते.

## वृत्तरत्न सम्राट :

**'दैनिक वृत्तपत्र सम्राट'**[१५] मध्ये अनुसूचित जाती-जमाती, भटक्या विमुक्त जाती-जमाती, इतर मागासवर्गीय जमाती संदर्भात विविध लेख आणि वातम्या प्रसिद्ध केल्या जातात. उदा. 'विमुक्तांचा काळा इतिहास' (अविनाश गायकवाड - १८ जाने, २००७ गुरू पान नं.४) 'वडार समाज, इतिहास सद्यस्थिती व भविष्यकाळातील वाटचाल' (तुकाराम माने २० ऑगस्ट- २००६ रवि पान. ५) 'खैरलांजी हत्याकांड अमानुष्य कृत्य' (प्रदिप ढोवळे - २० नोव्हे, २००६ पान नं.१) 'ओ.वी.सी. नो उठा लढ्यास सिद्ध व्हा' (प्रकाश कापडे १२ नोव्हे, २००६ पान नं. रवि), 'भटक्या विमुक्तांना धम्म सांगितला पाहिजे' (१३ फेवु २००७ मंगळ, पान नं. ८) यासारखे लेख व वातम्या सम्राट वृत्तपत्र हे प्रसिद्ध करून समाज प्रवोधनाचे काम प्रामाणिकपणे करत असते. याच्या माध्यमातून सर्व स्तरातील निम्न जाती-जमाती यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली जाते.

## कदम एन.डी. :

यांनी आपल्या **'महाराष्ट्रातील भटका समाज-संस्कृती व साहित्य' (१९९२)**[१६] या पीएच.डी. च्या शोध-निबंधामध्ये महाराष्ट्रातील भटक्या जमाती व विमुक्त जातींचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते भटक्या जमाती व विमुक्त जाती ह्या विशेषत: दरिद्र्य, अज्ञानी निरक्षरता आणि अंधश्रद्धेनी भरलेल्या आहेत. गेली ५० वर्षे त्यांना स्वातंत्र्य मिळालेले असूनसुद्धा अद्याप पर्यंत आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय प्रगती साधलेली नाही. त्यांनी प्रामुख्याने महाराष्ट्रातील १४ विमुक्त जातींचा शोध घेऊन अभ्यास केलेला आहे. उदा. वैदू, कैकाडी, नंदीवाले, डवरी, गोसावी, माकडवाले, कूडमुडे जोशी, पोतराज, वाघ्या मुरळी, गोंधळी, वेरड, गारूडी, वहुरूपी, वासुदेव आणि धनगर इ. तसेच त्यांचा व्यवसाय, पोषाख, सण-उत्सव, धर्म, अंधश्रद्धा, विवाह व अंत्यविधी आणि जातपंचायतींचा सखोल अभ्यास केलेला आहे. या अभ्यासातून त्यांनी विमुक्त जातींच्या समोरील सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी आणि त्याचा विकास होण्यासाठी काही उपाययोजना शासनाने कराव्यात यासाठी कल्याणकारी योजना योजिलेल्या आहेत.

## पाटील पंढरीनाथ :

यांनी आपल्या **'भटके भाईबंद' (१९९०)**[१७] या शीर्षकाच्या पुस्तकामध्ये महाराष्ट्रातील भटक्या जाती व विमुक्त जाती यांच्या वास्तविक परिस्थितीचे विवेचन केलेले आहे. त्यांनी प्रकाशित झालेल्या पंधरा वेगवेगळ्या लेखामधून भटक्या जमातींच्यावर विशेषत: पोतराज, वासुदेव, गोंधळी, वाघ्या-मुरळी, कडकलक्ष्मी, धनगर, वेरड, जिप्सी आणि आदिवासी इत्यादींच्या सद्यपरिस्थितील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक दर्जावर प्रकाश टाकलेला आहे.

## सिम्हाद्री व्हाय.सी. :

यांनी आपल्या **"Denotified Tribes : A Sociological Analysis" (1991)**[१८] या शीर्षकाच्या पुस्तकामध्ये भारतातील भटक्या जमातींना गुन्हेगारी जमात म्हणून कशामुळे ओळखले जात होते या संदर्भात विवेचन केलेले आहे. यासाठी त्यांनी १८७१ ते १९५२ पर्यंतच्या कालावधीमधील सर्व माहितींचा अभ्यास केला आहे. विशेषत: त्यांनी दुय्यम स्त्रोत

16899

वापरून रेकॉर्ड ग्रंथालय साहित्याचा वापर केला आहे. त्याकरिता त्यांनी एडवीन सुझलँड यांचा सिद्धांताचा वापर करून सामाजिक, सांस्कृतिक, मानववंशशास्त्रीय, आर्थिक परिस्थितीचे आणि भटक्या जमातींच्या वस्तुस्थितीचे अध्ययन केलेले आहे. सदर पुस्तकामध्ये त्यांनी भटक्या जमाती आणि विमुक्त जाती यांना गुन्हेगार हे नाव कसे पडले? यासंबंधीचे स्पष्टीकरण दिलेले आहे. या पुस्तकामधून भटक्या जाती व विमुक्त जाती यांची सत्य परिस्थिती समजून घेण्यास मदत होते.

## चव्हाण एस.एम.:

हिने आपल्या **"सातारा येथील वैदु जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास" (१९९४)** [१९] या एम.फील.च्या शोध निबंधामध्ये प्राचीन काळापासून भटके जीवन जगणाऱ्या 'वैदू' या भटक्या जमातीचा अभ्यास केलेला आहे. या शोध निबंधामध्ये तिने भटक्या जाती व जमाती, भटक्यांची उत्पत्ती, त्यांचे वर्गीकरण, भटक्या जमातींवर हिंदू धर्माचा प्रभाव, भटक्यांची कुटुंब व विवाह पद्धती, सण-उत्सव, व्यवसाय, भारतातील पारंपरिक, सामाजिक, आर्थिक व्यवहारातील भटक्यांचे स्थान, भटक्यांची वैशिष्ट्ये, त्यांच्या अडचणी, भटक्यांच्या पुनर्वसनासाठी झालेले प्रयत्न आणि भटक्यांच्यात झालेले बदल इ.बाबत सखोल अध्ययन केलेले आहे. तसेच सातारा शहरातील वैदूंचे स्थान, लोकसंख्या, साक्षरता दर, हवामान, ऐतिहासिक पार्श्वभूमी, सामाजिक व सांस्कृती वारसा, व्यवसाय धार्मिक जीवन, स्त्रीचा दर्जा, जात पंचायतीचा प्रभाव आणि बदलते जीवन, इत्यादीबाबत सुंदर व सखोल अध्ययन केलेले आहे.

## मधुरसुदन जयरथ :

यांनी **हिमाचल प्रदेशातील आदिम जमातीच्या राहणीमानाच्या स्तराचा मानववंशशास्त्रीय दृष्टीकोनातून तौलनिक अभ्यास (१९८६)** [२०] केला आहे. हिमाचल प्रदेशातील आदिम जमातीचा सद्यस्थितीतील राहणीमानाचा स्तर अभ्यासणे, त्यांच्या सवयी, अन्न, कपडे, घरे, व्यवसाय, आरोग्य, शिक्षण इ.बाबतीतील परिवर्तन अभ्यासणे, त्यांच्या समस्या अभ्यासणे व राहणीमानाचा स्तर उंचावण्यासाठी काही उपाययोजना सुचविणे या उद्देशांनी हा अभ्यास केलेला

आढळतो. यासाठी त्यांनी 'नमुना -निवड तंत्र' अभ्यास पद्धतीचा वापर केला आहे.

**चव्हाण रामनाथ :**

यांनी आपल्या **'जाती आणि जमाती' (१९८९)**[२१] या पुस्तकात महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील जाती-जमातींच्या जनजीवनाची दुर्मिळ अशी माहिती दिलेली आहे. यामध्ये प्रामुख्याने मातंग,. चर्मकार, मेहतर, ढोर, बुरूड, पद्मशाली, कोल्हाटी, कुडमुडे जोशी, काशी कापडी, घिसाडी, परदेशी भोई, वेड वाघरी, गोपाळ, वैदू, घारेकंजर, बेलदार, सिक्कलवार, टकारी, रामोशी, रजपूत भामटा, कंजारभाट, पारधी, छप्परबंद, राजगोंड, मांग, गारूडी यासारख्या दलित वर्गातील जाती, भटक्या समाजातील जाती, विमुक्त समाजातील जाती-पोटजाती यांचा अतंर्भाव होतो. भटक्या समाजातील चालीरीती, लग्नविधी, कुटुंबसंस्था तसेच जन्म, मृत्यू विवाह संस्कार इत्यादीचे वेगळेपण संस्कार यासारख्या सांस्कृतिक घटकांची सविस्तर चर्चा केली आहे. जमातीतील सदस्यांचे प्रभावी नियंत्रण करण्यासाठी शिक्षेची तरतूदही पाशवी आणि अमानूष अशी आहे. लेखकाच्या मते, स्वातंत्र्याला ४२ वर्षे होऊनही भटका समाज विकासाच्या सर्व कार्यक्रमापासून वंचित राहिला आहे. गुन्हेगारीचा शिक्का घेऊन शेकडो वर्षापासून उपेक्षित असे जीवन भटके विमुक्त जाती-जमाती जगत आहे. या स्थितीला कारण एकच आहे ते म्हणजे हा समाज अजूनही असंघटीत आहे. भटक्या विमुक्तांच्यावरील साहित्यातील हे पुस्तक म्हणजे एक महत्त्वपूर्ण उपलब्धी असून त्यामध्ये २५ भटक्या जमातींची परिपूर्ण अशी माहिती दिली आहे.

## विभाग दुसरा

### २.२ संशोधन पद्धती : (The Research Method)

या विभागात प्रस्तुत अभ्यासासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धतीचे विवेचन करण्यात आले आहे. संशोधन विषयाची निवड, संशोधनासाठी निवडलेली नेमकी समस्या, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधन क्षेत्र, नमुना निवडीची पद्धत, तथ्य संकलनासाठी वापरलेले तंत्र, तथ्य संकलन माहितीचे विश्लेषण व सादरीकरण आणि प्रकरणांची रूपरेषा या संशोधन आराखड्याच्या विविध पैलूंचे विवेचन या प्रकरणात करण्यात आले आहे.

## २.२.१ संशोधन विषयाची निवड : (Selection of Research Topics)

कोणत्याही गोष्टीत किंवा घटकात बदल होणे हा नैसर्गिक नियम आहे. तेव्हा मानव समाजात सुद्धा बदल होणे हे स्वाभाविकच आहे. फरक इतकाच की काही समाजात बदल वेगाने होतात तर काही समाजात बदल मंद गतीने होतात. परंतु आजच्या आधुनिकीकरणाच्या काळामध्ये आता सर्वच समाजामध्ये बदल हे वेगाने होत असल्याचे आढळते. आधुनिकीकरण ही एक परिवर्तन प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशा समाजजीवनाच्या विविध भागात परिवर्तने घडून येतात. अशी परिवर्तने संचित (Cumulative) आणि अभियोजनात्मक स्वरूपाची असतात. अशा परिवर्तनामुळे हळू-हळू संरचनात्मक विभेदन आणि परिवर्तन घडून येते. १८ व्या शतकात युरोपीय समाजात प्रारंभ झालेल्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत अनेक संरचनात्मक बदल घडवून आणले जात आहेत.

आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे पारंपरिक भारतीय समाजाचे स्वरूप बदलत चालले आहे. जाती व्यवस्था, धर्मव्यवस्था पारंपरिक एकत्र कुटुंब पद्धती, विवाह संस्था, इ. मध्ये अनेक बदल घडून येत आहेत. असे हे बदल संस्थात्मक पातळीवरील आहेत. संस्थात्मक बदलाबरोबरच विचार करण्याची पद्धती, श्रद्धाव्यवस्था, मते, मुल्ये, अभिवृत्ती आणि वर्तन प्रकार इ.मधून अनेक बदलांची अभिव्यक्ती होते. धर्मनिरपेक्ष शिक्षणपद्धतीमुळे आधुनिकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळते. भारतात ब्रिटिश राजवटीपासूनच धर्मनिरपेक्ष शिक्षणाला प्रारंभ झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात तर संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्ट्या शिक्षण व्यवस्थेत विस्तार आणि वाढ घडवून आणण्याचे अनेक प्रयत्न झाले आहेत.

एम. फिल. परीक्षेकरीता ऐच्छिक विषय (Optional Paper) म्हणून मी 'भारतीय समाज' (Indian Society) या विषयाची निवड केली. त्यामुळे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे भारतीय समाजातील परिवर्तन तसेच भारतीय समाजाचे बदलते स्वरूप या विषयावरील निवडक सैद्धांतिक माहितीचा अभ्यास करण्याची संधी मिळावी म्हणून एम.फिल. साठी लघुशोध निबंधाचा विषय हा ऐच्छिक विषयाशी संबंधित निवडण्याचे आधीच निश्चित केले होते. त्यानुसार प्रस्तुत संशोधनासाठी "माणगाव खेड्यातील बदलत्या

वेरड समुदायाचा एक समाजशास्त्रीय अभ्यास" ("CHANGING BERAD COMMUNITY IN MANGAON VILLAGE: A SOCIOLOGICAL STUDY") हा विषय निवडण्याचे निश्चित केले.

आधीच नमूद केल्याप्रमाणे आधुनिकीकरण आणि सामाजिक परिवर्तन या प्रक्रियांत जवळचा संबंध आहे. आधुनिकीकरणाच्या माध्यमातून शिक्षणाला आलेले महत्त्व आणि शिक्षणामुळे आधुनिक मूल्यात (उदा. स्वातंत्र्य, समानता, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन इ.) झालेली वाढ यामुळे भारतीय समाजामधील ज्या मागासलेल्या जाती, जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती, यांच्यामधील अभिवृत्तित, मूल्यात काही परिवर्तन झाले आहे का? होत आहे का? हे तपासून पाहण्याच्या दृष्टीने सदर संशोधन हाती घेण्याचे ठरविले. एकदा विषय निश्चित झाल्यावर सदर अभ्यास चंदगड तालूक्यातील माणगांव खेड्यातील वेरड समुदायातील लोकांमधील नमुना निवडून त्यांचेकडून आवश्यक अशी माहिती मिळविण्याचे निश्चित केले. त्यानुसार प्रस्तुत अभ्यासासाठीच्या संशोधन समस्येचे सूत्रण पुढीलप्रमाणे करण्यात आले.

### २.२.२ संशोधन समस्या : (The Research Problems)

आजच्या आधुनिकीकरण, पाश्चिमात्यीकरण आणि नागरीकरणाच्या प्रक्रियेंचा परिणाम भारतीय समाजावर होत आहे. त्याचा परिणाम म्हणजे भारतीय समाजामध्ये वेगाने होत असलेला बदल होय. या बदलाचा अभ्यास विशेषत: वेरड समुदायाचा अभ्यास हे संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यानुसार अभ्यासाचे शीर्षक पुढीलप्रमाणे आहे.

"माणगांव खेड्यातील बदलत्या वेरड समुदायाचा एक समाजशास्त्रीय अभ्यास"
"CHANGING BERAD COMMUNITY IN MANGAON VILLAGE : A SOCIOLOGICAL STUDY"

### २.२.३ संशोधनाची उद्दिष्टे : (Objectives of the Study) :

बेरड समाज हा पूर्वी गुन्हेगारी जातीमध्ये समाविष्ट होता. परंतु स्वातंत्र्यानंतर या जातीवरील गुन्हेगार हा कलंक काढून या जातीला विमुक्त जात म्हणून जाहिर केले. स्वातंत्र्यानंतरही या समाजात रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा यांचे अजूनही प्रमाण जास्त आहे. या सर्व गोष्टीत वदल व्हावा म्हणून हा समाज प्रयत्न करीत आहे. त्यांची पारंपरिक जीवन

पद्धती, संस्कृती, रूढी परंपरा, चालीरीती, देवदेवता, उत्सव, सण, भाषा, पोशाख, व्यवसाय, कला, जात पंचायत यांची समाजाला माहिती झाली पाहिजे. त्यांचे प्रश्न, त्यांच्या सामाजिक समस्या समाजाला समजल्या पाहिजेत. त्यांची सांस्कृतिक, आर्थिक स्थिती, त्यांची अभिवृत्ती यांच्यातील परिवर्तन अभ्यासणे गरजेचे आहे. हेच उद्देश ठेऊन या जमातीचा अभ्यास केला आहे. सदर अभ्यासाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे ठरविण्यात आली.

१. वेरड समुदायाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अध्ययन करणे.

२. वेरड समुदायाच्या सामाजिक-सांस्कृतिक जीवनांचे अध्ययन करणे.

३. वेरड समुदायाचे शैक्षणिक आणि धार्मिक जीवन जाणून घेणे.

४. वेरड समुदायाची आर्थिक आणि राजकीय परिस्थिती जाणून घेणे.

५. वेरड समुदायामध्ये काही वदल असल्याचा अभ्यास करणे.

## २.२.४ संशोधन क्षेत्र : (The Study Area) :

सदरचे संशोधन करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यामधील माणगांव या खेड्यातील 'वेरड' समुदायाची निवड केली. पश्चिम महाराष्ट्राचे शेवटचे टोक व सह्याद्री पर्वत रागांची आठवी शाखा असलेला चंदगड हा तालुका डोंगराळ भागात वसलेला आहे. साहजिकच माणगाव खेडे हे डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. माणगाव हे खेडे तालुक्याच्या ठिकाणापासून २२ किलोमीटर अंतरावर आहे. तर कोल्हापूरपासून म्हणजेच जिल्ह्याच्या ठिकाणापासून १३0 किलोमीटर अंतरावर आहे. कर्नाटक राज्यामधील वेळगाव हे शहर माणगाव खेड्यांपासून अवघे २२ किलोमीटर आहे. चंदगड तालुक्याला निसर्गसौंदर्य लाभलेले आहे. हा तालुका वेगवेगळ्या वनस्पती, प्राणी, पशु—पक्षीने नटलेला आहे. माणगांव खेड्याजवळून ताम्रपर्णी नावाची नदी वहात असून या नदीला वारमाही पाणी असते तेव्हा पाण्याने समृद्ध असा हा भाग आहे. एकदंरीत कोल्हापूर जिल्ह्यातील सुखी व समृद्ध असा भाग अशी ख्याती चंदगड तालुक्याची आहे.

चंदगड तालुक्यामधील अनेक खेडेगावात वेरड समुदायाचे लोक आहेत. (उदा. वेर्डी कार्वे, डुक्करवाडी, निट्टूर, कोवाड, माणगांव, लाकूरवाडी, कानूर, तुर्केवाडी, वुक्कीहाळ,

करेकुंडी, उंबरवाडी आणि माणगाववाडी इ.) यापैकी माणगांव या खेडेगावात बेरड या समुदायाचे लोक जास्त संख्येने असलेले दिसून येतात. माणगांव खेड्यामध्ये बेरड समुदायातील लोकांची संख्या जवळ-जवळ ९५२ इतकी असून त्यांची २५० इतकी घरे आहेत. माणगांव खेड्याचे क्षेत्रफळ २५.६ एकर इतके आहे. त्यापैकी बेरड समुदाय २.५ इतक्या क्षेत्रफळामध्ये वसलेला आहे. हा समुदाय गावाच्या उत्तरेकडील दिशेला वसलेला आहे. आजच्या औद्योगिकरण, पाश्चिमात्यीकरण आणि नागरीकीकरण या प्रक्रियेचा शिरकाव खेडेगावातही झालेला आहे. तेव्हा एकंदरीत या प्रक्रियांचा परिणाम बेरड समुदायावर कितपत प्रभाव पडला आहे? ते तपासून घेणे शक्य आहे. बहुपत्नीत्व, घटस्फोट, व्यावसायिक परिवर्तन, शिक्षणाचा प्रसार, कुटुंब नियोजन, अंधश्रद्धा निर्मूलन इ. बाबतीत परिवर्तनाची वास्तव परिस्थिती बेरडांच्या बाबतीत समजावून घेणे शक्य आहे. म्हणून चंदगड तालुक्यातील माणगांव या खेड्यातील बेरड समुदाय हा अभ्यासाच्या दृष्टीने एक प्रातिनिधिक क्षेत्र म्हणून निवडला आहे.

### २.२.५ संशोधन आराखडा : (Research Design) :

प्रस्तुत अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा (Descriptive Research Design ) अवलंब केला आहे.

### २.२.६ नमुना निवड पद्धत (Sampling Method) :

माणगांव खेड्यातील ग्रामपंचायतीच्या कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार माणगांव खेड्याची लोकसंख्या ३६२१ इतकी आहे. त्यापैकी बेरड समुदायाची लोकसंख्या ९५२ इतकी असून त्यांची घरे / कुटुंबे २५० इतकी आहेत. संशोधकाजवळ असणारा वेळ आणि पैसा या बाबी ध्यानात घेऊन माणगांव खेड्यातील बेरड समुदायातील ५० कुटुंबाचा नमुन्यात समावेश करण्याचे ठरविले. त्यानुसार यादृच्छिक नमुना निवड तंत्राच्या साहाय्याने (With the help of Random Sampling technique) निवड करण्यात आली. यादृच्छीक नमुना निवडीची विविध तंत्रे आहेत. त्यापैकी व्यवस्थाबद्ध नमुना निवड (Systematic) या तंत्राचा अवलंब करण्यात आला. प्रथमत: बेरड समुदायातील कुटुंबाच्या यादीतील एक ते पाच क्रमांच्या

कुटुंवापैकी क्रमांकाच्या कुटुंवाची निवड केली. त्यानंतर ५, १0, १५ या क्रमाने एकूण ५0 कुटुंवाची निवड केली.

## २.२.७ तथ्य संकलनाची तंत्रे (Tools for Collection of Data ) :

प्रस्तुत अभ्यासामध्ये माहिती मिळविण्यासाठी मुलाखत अनुसूची (Interview Schedule) या तथ्य संकलनाच्या तंत्राचा वापर केला आहे. मुलाखत पद्धती निवडण्याचे कारण म्हणजे तेथील लोक अशिक्षित अज्ञानी आहेत. त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधणे, एखादा प्रश्न जर त्यांना संदिग्ध वाटला तर तो स्पष्ट करून सांगणे, इतर प्रश्नांच्या साह्याने त्यांच्याकडून माहिती उपलव्ध करून घेणे, त्यांच्या गृहजीवनाची पाहणी करणे व जास्तीत जास्त वास्तव माहिती मिळविणे हे याच पद्धतीने शक्य झाले. कुटुंव सदस्यसंख्या, विवाह, राहणीमान, शिक्षण, स्त्रियांचा दर्जा, धार्मिक प्रथा इ. विषयींची प्रत्यक्ष परिस्थिती आणि दृष्टिकोन जाणून घेण्याच्या दृष्टीने हे प्रश्न निवडले आहेत. काही प्रश्न खुले आणि काही वंद स्वरूपाचे आहेत ही प्रश्नसूची परिशिष्ट नं ३ मध्ये जोडली आहे.

अभ्यासाची उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेवून एक मुलाखत अनुसूची तयार केली. सदर अनुसूचीची पूर्व चाचणी (Pre-Testing) घेण्यात आली. आवश्यक तेथे प्रश्नांमध्ये दुरूस्त्या करण्यात आल्या. काही प्रश्न वगळले तर काही नवे प्रश्न समाविष्ट करण्यात आले. सुधारित मुलाखत अनुसूचीद्वारे वेरड समुदायाकडून माहिती मिळविली आहे. नमुन्यात समाविष्ट असणाऱ्या कुटुंवातील कुटंव प्रमुखांच्या किंवा त्यांच्या अनुपस्थितीत घरात उपलव्ध असणाऱ्या जेष्ठ व्यक्तिंच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. याशिवाय वैयक्तिक निरीक्षण तंत्र तसेच वेरड समुदायातील इतर व्यक्तिंशी केलेली अनौपचारिक चर्चा तसेच छायाचित्रे यांचाही वापर प्रस्तुत अभ्यासासाठी माहिती मिळविण्याकरिता केला आहे.

मिळालेल्या माहितीचे लोकसंख्या, वैवाहिक स्थिती, व्यवसाय शिक्षण इ. गट पाडून समानतेनुसार गट तयार करून त्यांचे वर्गीकरण केले आहे. यानुसार त्यांचे विश्लेषण व विवेचन केले आहे. वरील पद्धतीने वेरड समुदायाची लोकसंख्या, वैवाहिक स्थिती, व्यवसाय, शिक्षण, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवन यासंवंधी निष्कर्ष मांडले आहेत.

बेरड समुदायातील कुटुंब प्रमुखांनी मुलाखत देण्याची तयारी दाखविली म्हणून सोईस्कर पद्धतीने मुलाखत घेणे शक्य झाले. प्रत्येक कुटुंब प्रमुखाची मुलाखत व काही लोकांच्या विशेष मुलाखती यामुळे निघणारे निष्कर्ष हे जास्तीत जास्त अचूक काढण्याचा उद्देश साध्य झाला आहे.

### २.२.८ तथ्य संकलन : (Collection of Data) :

संशोधनासाठी निवडलेल्या नमुन्यातील सर्व कुटुंबातील व्यक्तिकडून संशोधकाने मुलाखत अनुसूची भरून घेऊन माहितीचे संकलन केले आहे. तथ्य संकलनाचे काम ६ जून २०११ ते ५ जुलै २०११ या कालावधीत पूर्ण केले.

### २.२.९ माहितीचे स्त्रोत (Sources of Data) :

प्रस्तुत अभ्यासासाठी माहिती मिळविण्यासाठी पुढील दोन स्त्रोतांचा अवलंब केला.

### अ. प्राथमिक स्त्रोत (Primary Data) :

प्रस्तुत अभ्यासासाठी माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत अनुसूची (Interview Schedule) या तंत्राचा अवलंब करून बेरड समुदायातील व्यक्तिंना प्रत्यक्षात प्रश्न विचारून माहिती मिळविली.

### ब. दुय्यम स्त्रोत : (Secondary Data) :

प्रस्तुत अभ्यासासाठी माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक स्त्रोताबरोबरच दुय्यम स्त्रोत म्हणून प्रकाशित झालेली माहिती, पुस्तके, साहित्य, संदर्भ ग्रंथ, जरनल्स, इंटरनेट, प्रसिद्ध झालेले संशोधन, माणगांव खेड्याच्या ग्रामपंचायतीमधील नोंदवही, कोर्ट आणि पोलिस रिपोर्ट तसेच रेकॉर्ड इ. चा आधार घेऊन माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. संबंधित खेड्यातील ग्रामपंचायत, ऑफीस व तलाठी कार्यालय, यातील शासकीय माहिती, वृत्तपत्रातून प्रकाशित झालेल्या माहितीचा ही आधार घेतलेला आहे.

### २.२.१० माहितीचे विश्लेषण व सादरीकरण (Analysis & Interpretation of data) :

मुलाखत अनुसूचीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे सुयोग्य वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यासाठी संगणकाचा वापर करून एक संकेत पुस्तिका (Code-Book) तयार करण्यात

आली. संकेत पुस्तिकेच्या साहाय्याने मिळविलेल्या माहितीचे सांकेतीकरण केले. सदरची माहिती समाजशास्त्र विभाग UGC-SAP-DRS-PHASE-I या प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध झालेल्या संगणक प्रयोग शाळेतील संगणकात भरण्यात आली. SPSS या सॉफ्टवेअरच्या सहाय्याने उपलब्ध माहितीवर प्रक्रिया करण्यात आली.

संगणकाच्या सहाय्याने प्रक्रिया केलेल्या माहितीच्या आधारे सारण्या तयार करण्यात आल्या आहेत. त्यातील सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करून अभ्यासाचे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. अभ्यास विषय, अभ्यासाची उद्दिष्ट्ये, मिळविलेली प्राथमिक आणि दुय्यम माहिती यांचे योग्य संघटन आणि सादरीकरण करण्यासाठी विविध प्रकरणांचे नियोजन करण्यात आले.

## २.२.११ अहवालातील प्रकरणांची रूपरेषा : (Chapterization Scheme)

प्रकरण १ : प्रस्ताविक

प्रकरण २ : संशोधन साहित्याचा आढावा आणि संशोधन पद्धती

प्रकरण ३ : वेरड समुदायाची पार्श्वभूमी

प्रकरण ४ : वेरड समुदायाचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन आणि बदल

प्रकरण ५ : वेरड समुदायाचे आर्थिक, शैक्षणिक जीवन आणि बदल

प्रकरण ६ : वेरड समुदायाचे धार्मिक, राजकीय जीवन आणि बदल

प्रकरण ७ : वेरड समुदायातील बदलासंबंधीची माहिती

प्रकरण ८ : सारांश, निष्कर्ष आणि सूचना

## २.२.१२ अभ्यास करताना आलेल्या अडचणी :

वेरड समुदायातील बहुतांश लोक अशिक्षित असल्याने मुलखात घेण्याचा उद्देश प्रथम त्यांना पटवून द्यावा लागला. त्यांना मिळणाऱ्या राजकीय, शासकीय सवलती बंद होणार नाहीत, माहितीचा गैरवापर केला जाणार नाही हे स्पष्ट केल्यानंतरच मुलाखती दिल्या गेल्या. वेरड समुदायातील लोकांचा व्यवसाय हा मजुरी करणे, दारू गाळणे, खोदकाम करणे, गुरे चारणे, पिकांची राखण करणे, पहारेकरी राहणे इत्यादी असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क साधणे

थोडे कठीण झाले. त्यांच्या कामाच्या ठिकाणी जाऊन सकाळ, दुपार, रात्री त्यांच्या सोईनुसार त्यांच्याशी संपर्क साधून या मुलाखती घ्याव्या लागल्या.

### २.२.१३ अभ्यासाच्या मर्यादा :

बेरड समुदायाचा स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतरचा अभ्यास करावयाचा असल्याने पूर्वी ची माहिती मिळणे महत्त्वाची होती. तेव्हा जुन्या व वयस्कर लोकांची आवश्यकता होती. परंतु काळाच्या ओघात जुने व वयस्कर लोक कमी होत गेले. परिणामी या लोकांचा वारसा चालविणारे त्यांची मोठी झालेली मुले असतील, प्रौढ व्यक्ति असतील यांच्याशी चर्चा करून त्यांनी सांगितलेली माहिती खरी मानून अभ्यास करावा लागला. तसेच माहिती गोळा करण्यासाठी समुदायात गेलो असताना तेथील लोकांनी प्रथमत: माहिती देण्याचे टाळले कारण त्यांना असे वाटत होते की मी एक शासनाचा माणूस असून खरी माहिती गोळा करून ती शासनाला पूरवेल व आम्हाला मिळत असलेल्या सुविधा वंद होतील आणि येथून पुढे मिळणाऱ्या सुविधा ही आम्हाला मिळणार नाहीत. या भितीने ते माहिती देण्याचे टाळत होते. परिणामी त्यांना पटवून सांगण्यामध्ये खूप वेळ खर्च झाला. त्यांना विश्वासात घेऊन समजेल अशा भाषेत त्यांच्या प्रश्नांचे निराकरण करून मग माहिती मिळविली. त्याचवरोवर त्यांना असेही वाटत होते की, ही माहिती दिल्यावर आम्हाला काही सुविधा शासनाकडून मिळतील आपल्या मुलांना नोकऱ्या मिळतील अशा प्रकारच्या त्यांच्या माझ्याकडून भरपूर अपेक्षा होत्या, तेव्हा त्यांचा अपेक्षाभंग होणार नाही अशी काळजी घेऊन माहिती कशा करीता पाहिजे हे त्यांना पटवून देऊन त्यांच्याकडून माहिती मिळविली.

## २.३ सैद्धांतिक दृष्टिकोन (Theoretical Perspective)

समाजशास्त्राचा अभ्यास विषय हा व्यक्ती व संस्था, व्यक्ती व समाज, दोन किंवा दोनापेक्षा अधिक व्यक्ती, व्यक्ती समूह व संस्था यांच्यातील पारंपरिक क्रियांचे व परस्पर संवंधाचे अध्ययन करण्याशी निगडीत असतो. मानवी वर्तन व्यवहारात आढळून येणाऱ्या व्यक्तीच्या क्रिया व प्रतिक्रिया यांचा अभ्यास सामाजिक व मानसशास्त्रीय दृष्टीकोणातून केल्यामुळेच समाजव्यवस्थेचे आकलन व्यक्तीला होत असते. सामाजिक संरचना ही व्यक्तीच्या

दर्जात्मक भूमिकेशी निगडित असते. प्रत्येक समाजव्यवस्थेत व्यक्तीला जो विशिष्ट दर्जा प्राप्त झालेला असतो त्याला अनुसरून क्रियाशील स्वरूपाची भूमिका व्यक्तीला वठवावी लागते. सामाजिक स्थैर्य प्रत्येक व्यक्तीच्या दर्जात्मक क्रियाशिलतेवर अवलंविलेले असल्याने समाज व्यवस्थेचा अभ्यास हा संरचनात्मक कार्यवादी दृष्टीकोणातून केला जातो. व्यक्तीचा सामाजिक दर्जा हा भूमिकेवर अथवा क्रियाशिलतेवर अवलंविलेला असतो. दर्जा जसजसा वदलत जातो, तसतशी त्याची कार्येही वदलत जातात. परंतु ही सर्व कार्ये एकमेकांशी निगडित असल्याने त्यांचा साकल्याने अभ्यास अभ्यासकाला करावा लागतो. समाजव्यवस्थेचा, सामाजिक जीवन पद्धतीचा संरचनात्मक कार्यवादी दृष्टीकोनातून अभ्यास करण्याचा प्रयत्न रॉवर्ट मर्टन व टॉलकॉट पार्सन्स यांनी केलेला आहे. सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया ही सातत्याने चालू राहणारी प्रक्रिया असल्याने त्या परिवर्तनाच्या प्रक्रियेतून समाजव्यवस्थेत अधिकाधिक क्लिष्टता निर्माण होऊ लागली म्हणुन सामाजिक परिवर्तन व सामाजिक वैविध्यता यांच्या संदर्भात संरचनात्मक कार्यवादी दृष्टीकोणाचा अवलंव करण्याकडे आधुनिक समाजशास्त्रज्ञ भर देत आहेत.

विशिष्ट कालातील सामाजिक परिस्थितीतील सामाजिक घडामोडी अथवा समस्यांचे सामाजिक वास्तवतेच्या आधारावर काही निष्कर्ष प्रस्थापित केले जात असले तरी भिन्न काळातील सामाजिक परिस्थितीला ते लागू पडू शकत नाही. एखाद्या निष्कर्षाची विश्वसनीयता वेळोवेळी पडताळून पाहण्यासाठी अभ्यासकाला तुलनात्मक विभिन्न धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय समाजातील वैविध्यतेचा, समाज जीवनातील फरकाचा अभ्यास केल्याशिवाय सामाजिक विश्वाचा परिचय होणे अत्यंत कठीण आहे व त्यासाठी तौलनिक दृष्टीकोन अभ्यासकाला स्वीकारावा लागतो.

तुलनात्मक दृष्टीकोनाचे स्वरूप हे वर्तमानकालीन घडामोडींच्या तथ्यावर अवलंविलेले असते परंतु वर्तमानकालीन समाजव्यवस्था, सामाजिक घडामोडी व सामाजिक समस्यांना भूतकालीन समाज व्यवस्था व समाज जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कारणीभूत असल्याने ऐतिहासिक संदर्भाचे विवेचन करणे अत्यंत आवश्यक असते.

वरीलप्रमाणे असे अनेक दृष्टीकोन उदा. तात्त्विक समाजशास्त्रीय दृष्टीकोन, पृथ्थकरणात्मक दृष्टीकोन, प्रतिक्रियात्मक आंतरक्रिया दृष्टीकोन इत्यादी दृष्टीकोन मानवी समाजाचा अभ्यास करणाऱ्यासाठी या दृष्टीकोनांचा अवलंब करून वेगवेगळ्या विचारवंतांनी, संशोधकांनी, समाजशास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या पद्धतीने वेगवेगळ्या मानवी समाजाच्या अंगाचा अभ्यास केलेला आहे.

हर्बट स्पेन्सरनी संरचनात्मक कार्यवादी दृष्टीकोनाच्या माध्यमातून जीव व समाज यांचा तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास करून सामाजिक उत्क्रांतिवादाचा सिद्धांत विशद केला. एमिल डरखीम, मॅलिनोस्की, रॅडक्लीफ वाऊन इ. नी समाजशास्त्रात व सामाजिक मानवशास्त्रात संरचनात्मक कार्यवादाचा पुरस्कार केला. समाजव्यवस्थेचा, सामाजिक जीवन पद्धतीचा अभ्यास रॉबर्ट मर्टन व टॉलकॉट पार्सन्स यांनी याच दृष्टीकोनातून केला. समाजशास्त्राचा जनक ऑगस्त कॉम्त यांनी सामाजिक स्थितिस्थापकत्वाची व सामाजिक गतिमत्त्वाची संकल्पना या दृष्टीकोनातून मांडली. सामाजिक संरचनेचा व प्रकार्यवादाचा अभ्यास करतेवेळी सामाजिक संबंधांच्या अध्ययनाकडे चार्ल्स कूलेनी विशेष भर दिलेला आहे. विल्फ्रेडो पॅरेटोनी आंतरक्रियेचे व श्रेष्ठजन सिद्धांताचे विशेष अध्ययन संरचनात्मक कार्यवादी दृष्टीकोनातून केलेले आहे. मॅक्स वेबर यांनी याच दृष्टीकोनातून सामाजिक क्रियेच्या संकल्पनेवर भर दिला आहे. एम.एन.श्रीनिवास यांनी समाजशास्त्रीय संशोधनात्मक अध्ययनात संरचनात्मक कार्यवादी दृष्टीकोनाचा वापर केला आहे. लुईस ड्युमांट, के.एम.कपाडिया, इरावती कर्वे, मदन टी.एन, योगेंद्रसिंह इ.ही या दृष्टीकोनाशी निगडीत आहेत.

भारतीय समाजशास्त्राचे जनक जी.एस.धुर्ये यांनी इंडो युरोपियन सांस्कृतिक समुदायातील कुटुंबव्यवस्थेतील नातेविषयक संबंधाचा अभ्यास तुलनात्मक दृष्टीकोनातून केला आहे. त्यांनी १२५ वर्षांच्या ब्रिटिश कालावधीत भारतीय समाजव्यवस्थेत कोणकोणत्या प्रकारची स्थित्यंतरे घडून आली याचे तुलनात्मकदृष्ट्या विवेचन केले आहे. तसेच त्यांनी हवेली तालूक्यातील ११० खेड्यांचा तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास करून ग्रामीण जीवनाचे वस्तुनिष्ठपणे अध्ययन केलेले आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

द्वंद्वात्मक दृष्टीकोनाचा पुरस्कार करून भारतीय समाजव्यवस्थेचे, सामाजिक जीवन पद्धतीचे, सामाजिक समस्यांचे व पारंपरिक सामाजिक संस्थांचे अध्ययन करणाऱ्यात डॉ. डी. पी. मुखर्जी, ए. आर. देसाई, रामकृष्ण मुखर्जी यांचा विशेष उल्लेख केला जातो.

वरीलप्रकारे भारतीय समाजव्यवस्थेचा, समाज जीवनाचा सामाजिक घडामोडींचा व सामाजिक समस्यांचा अभ्यास करतेवेळी पाश्चात्य व भारतीय समाजशास्त्रज्ञांनी व संशोधकांनी ब्रिटिश काळापासून वेगवेगळ्या अभ्यास पद्धतींचा व अध्ययन तंत्रांचा अवलंब केलेला आहे. तेव्हा माझ्या लघुशोध निबंधामध्ये विशिष्ट अशा एका दृष्टीकोनाचा वापर न करता वेगवेगळ्या विचारवंतानी, संशोधकानी वापरलेले वेगवेगळे सैद्धांतिक दृष्टीकोन वापरून प्रस्तुत अभ्यास विषयाचा समाजशास्त्रीय अभ्यास केलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने संरचनात्मक प्रकार्यात्मक दृष्टीकोन व तुलनात्मक दृष्टीकोनाचा वापर केलेला आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :


१. गस्ती भीमराव, 'वेरड' पराख प्रकाशन, वेळगाव (१९८७).

२. गस्ती भीमराव, 'आक्रोश' राजहंस प्रकाशन, पुणे (२६ जाने, १९९३).

३. गस्ती भीमराव, 'सांजवारा' राज्ञी प्रकाशन, वेळगाव (मार्च,२००२).

४. मानवी विज्ञान परिषदचे त्रैमासिक, 'हाकारा' महाराष्ट्र राज्यद्वारा प्रकाशित, ऑक्टोंबर ते डिसेंबर १९८४., जानेवारी ते मार्च १९८५, जानेवारी ते मार्च १९८७, जानेवारी ते जून २००१.

५. मानवी विज्ञान परिषदचे त्रैमासिक, 'हाकारा' महाराष्ट्र राज्यद्वारा प्रकाशित, जाने ते जून, २००१, पृष्ठ क्र.५२

६. मानवी विज्ञान परिषदचे त्रैमासिक, 'हाकारा' महाराष्ट्र राज्यद्वारा प्रकाशित, आक्टो. ते डिसे., १९८४, पृष्ठ क्र.२९

७. मानवी विज्ञान परिषदचे त्रैमासिक, 'हाकारा' महाराष्ट्र राज्यद्वारा प्रकाशित, जानेवारी ते मार्च १९८७, पृष्ठ क्र.२७

८. मानवी विज्ञान परिषदचे त्रैमासिक, 'हाकारा' महाराष्ट्र राज्यद्वारा प्रकाशित, जानेवारी ते मार्च १९८७, पृष्ठ क्र.२१

९. मानवी विज्ञान परिषदचे त्रैमासिक, 'हाकारा' महाराष्ट्र राज्यद्वारा प्रकाशित, जानेवारी ते मार्च १९८७, पृष्ठ क्र.२०

१०. माने लक्ष्मण 'मुक्तायन' महाराष्ट्रातील विमुक्त जमाती-एक चिकित्सक अभ्यास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, (१९९७).

११. माने लक्ष्मण, 'वंद दरवाजा' ग्रंथाली प्रकाशन, मुंवई, (१९९३).

१२. माने लक्ष्मण, 'उपरा' ग्रंथाली प्रकाशन, मुंवई, आवृत्ती सातवी (१९९०).

१३. माने लक्ष्मण, 'पालावरचे जग' श्रीविद्या प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती, (१९९०).

१४. माने लक्ष्मण, 'विमुक्तायन' यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, आवृत्ती पहिली, (१९९७).

१५. दैनिक वृत्तपत्र 'वृत्तरत्न सम्राट' कोल्हापूर - १८ जाने, २00७, पृ.क्र.४, २0 ऑगस्ट २00६, पृ.क्र.५, २0 नोव्हें २00६ पृ.क्र.१, १३ फेवु २00७ पृ.क्र.८.

१६. कदम एन.डी., 'महाराष्ट्रातील भटका समाज-संस्कृती व साहित्य' (१९९२).

१७. पाटील पंढरीनाथ, 'भटके भाईवंद' सुरेश एजन्सी, पुणे, प्रथम आवृत्ती (१९९0).

१८. सिम्हाद्री व्हाय.सी. "Denotified Tribes : A Sociological Analysis" (1991).

१९. चव्हाण एस.एम., 'सातारा येथील वैदु जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास', एम.फिल. प्रबंध, सादर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-१९९३-९४.

२0. श्री मधुरसुदन जयरथ, 'हिमाचल प्रदेशातील आदिम जमातीच्या राहणीमानाचा तौलनिक अभ्यास', शोध निवंध, 'हाकारा', त्रैमासिक जाने ते मार्च, १९८५.

२१. चव्हाण रामनाथ नामदेव, 'भटक्या विमुक्तांचे अंतरंग' सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, (१९८९).

२२. गजेंद्रगड व्ही.एन., 'समकालीन समाजशास्त्रीय सिद्धांत', फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९३, पृष्ठ क्र.३६.